संक्रांतीच्या शुभेच्छा!

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक १५ जानेवारी २०२४ । पान १

# नव्याने विकसित परिसराचा पाणीप्रश्न सुटणार

## २०३१ ची लोकसंख्या गृहीत धरून महापालिकेने घेतला निर्णय

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शहराच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने विविध भागांत उंच जलकुंभ (टाक्या) उभारले आहेत. आठ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत असलेले १०२ जलकुंभ कमी पडत असल्याने नव्याने २९जलकुंभांचे काम हाती घेण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सद्य:स्थितीत लोकसंख्या २७ लाखांच्या घरात आहे. वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिके मार्फत नवनवीन स्रोत निर्माण करण्यात येत आहेत. शहरवासीयांना पवना, आंद्रा धरणासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत (एमआयडीसी) पाणीपुरवठा केला जात आहे. पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी महापालिका दररोज उचलते. रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यातून अशुद्ध पाण्याचा उपसा करून ते निगडी प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते. त्यानंतर जलवाहिनीद्वारे शहरातील विविध भागांतील जलकुंभामध्ये सोडून नागरिकांना वितरित केले जाते. नव्याने विकसित झालेल्या भागात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने जलकुंभ उभारले जाणार आहेत. सध्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १०२ जलकुंभ उभारण्यात आले आहेत. सन २०३१ ची लोकसंख्या गृहीत धरून नव्याने २९ जलकुंभ उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता रामनाथ टकले म्हणाले की, वाढते शहर आणि लोकसंख्येचा विचार करून पाण्याचे जलकुंभ उभारले जातात. नव्याने २९ जलकुंभ उभारण्यात येणार आहेत. त्याची कामे टप्प्याटप्प्याने हाती घेतली जाणार आहेत.सद्य:स्थितीत लोकसंख्या २७ लाखांच्या घरात आहे. वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिके मार्फत नवनवीन स्रोत निर्माण करण्यात येत आहेत. शहरवासीयांना पवना, आंद्रा धरणासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत (एमआयडीसी) पाणीपुरवठा केला जात आहे. पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी महापालिका दररोज उचलते. रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यातून अशुद्ध पाण्याचा उपसा करून ते निगडी प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते. त्यानंतर जलवाहिनीद्वारे शहरातील विविध भागांतील जलकुंभामध्ये सोडून नागरिकांना वितरित केले जाते.




# मोशीतील अतिउच्चदाब वीज उपकेंद्राचा प्रश्न सुटणार!

## आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीत प्रशासनाचा निर्णय

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवडमधील प्रस्तावित सफारी पार्क मोशी किंवा परिसरातील उपलब्ध शासकीय १५ एकर जागा महावितरण अतिउच्चदाब उपकेंद्राकरिता मिळणेबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करावा, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी राजेश देशमुख यांनी दिले आहेत. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा प्रशासनाशी संबंधित विविध प्रलंबित विकासकामांबाबत पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी राजेश देशमुख आणि संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. आमदार महेश लांडगे म्हणाले की, भोसरी, आकुर्डी औद्योगिक परिसर तसेच मोशी, चिखली, डुडूळगाव व सभोवतालचा परिसर वेगाने विकसित होत आहे. त्याच प्रमाणात वीज ग्राहकांची संख्या वाढली असून, मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याच भागात



ईडब्ल्यूएस गृहप्रकल्पांची कामेही प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे भविष्यात उपलब्ध यंत्रणेद्वारे वीज पुरवठा करणे जिकीरीचे होणार असून, अतिभारीत होवून वीज पुरवठ्याची गंभीर समस्या निर्माण होणार आहे. तसेच वीज पुरवठा खंडीत होण्याच्या तक्रारी वाढणार आहेत. परिणामी, भविष्यातील वीज मागणीच्या अनुशंगाने वीज पुरवठ्याबाबत पायाभूत सुविधा सक्षम करणे अत्यावश्यक आहे. या भागातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी मोशी येथे अतिउच्चदाब वीज उपकेंद्र उभारणे प्रस्तावित आहे. तसेच, २०१४ पासून भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली. २०१७ महापालिकेत सत्ता मिळाल्यानंतर निर्माण केलेल्या पायाभूत सोयी-सुविधांमुळे 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला आहे. पीएमआरडीए आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून पायाभूत प्रकल्प मार्गी लागले आहेत. खेड ते नाशिक फाटा एलिवेटेड हायवे याच भागातून जाणार आहे. त्यामुळे नागरिकरण आणि औद्योगिकरण मोठ्याप्रमाणात वाढणार आहे. त्यासाठी सफारी पार्क मोशी किंवा सभोवतालच्या परिसरातील उपलब्ध १५ जागा महावितरण अतिउच्चदाब उपकेंद्र उभारणीकरीता मिळावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी जिल्हाधिकारी प्रशासनाकडे केली. त्याला जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत.

# सामाजिक एकोप्याचा संदेश देत युवक राष्ट्रवादीचा 'क्षितिज-२०२४' उत्साहात

## पिंपरी-चिंचवडमधील पहिलाच उपक्रम : सूरज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पुढाकाराने सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश देत 'क्षितिज-२०२४' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याला शहरातील ख्रिस्ती बिशप, ज्येष्ठ धर्मगुरू, उद्योजक आणि समाजसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे 'क्षितिज- २०२४' चे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक पंकज भालेकर, उपाध्यक्ष विशाल काळभोर, सरचिटणीस विशाल काळभोर, कार्याध्यक्ष फझल शेख, युवती अध्यक्षा वर्षा जगताप आदी उपस्थित होते. राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी शहराच्या वतीने प्रथमच शहरातील ख्रिस्ती बिशप, ज्येष्ठ धर्मगुरु, उद्योजक व समाजसेवक यांचा 'नागरी सत्कार' करण्यात आला.या प्रसंगी प्रसिद्ध किर्तनकार आचार्य वसंतराव गायकवाड यांचा सुमधुर किर्तनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी युवकचे शहराध्यक्ष शेखर काटे, कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, तुषार ताम्हाने यांनी पुढाकार घेतला. उपाध्यक्ष अभिषेक केळकर, प्रतिश सावतडकर, सरचिटणीस सॅम्युएल मधुरे, संदेश चोपडे, तेजस गवळी, आकाश खरात, सचिव विल्यम यादव, सुमित जगधाने, मेल्विन नागरे, विल्सन यादव, संघटक सॅमसन अँथोनी यांनी आयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमित त्रिभुवन यांनी केली. संगीत साथसंगत डॉ. जयंत जाधव, अभिषेक जाधव यांनी केली.

### या मान्यवर धर्मगुरूंचा केला गौरव

**» बिशप रेव्ह. अँड्रयू राठोड, बिशप रेव्ह जोसेफ हिवाळे, रेव्ह. जोसेफ ढालवाले, पास्टर राजेश केळकर, पास्टर डॅनियल अँथनी, रेव्ह. सुखानंद डोंगरदिवे, पास्टर रमेश साळवी, डॅनियल दळवी, ॲड. प्रसाद सांगळे, ॲड. बाजीराव दळवी, नितीश दुबे, स्नेहल डोंगरदिवे या मान्यवरांना गौरव करण्यात आला. अशा प्रकारे एकूण ६० मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.**

# जीकेपी सोसायटीत जिजाऊंच्या जयंतीनिमित्त रक्तदान

## मोशीतील जी.के.पॅलेसियो सोसाटीमध्ये रक्तदान शिबिर



**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
मराजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मोशीतील जी.के .पॅलेसियो सोसाटीमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा पार पडली. शिबिरास आणि स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रक्तदान शिबिरा दरम्यान चिखली मोशी चऱ्होली हौसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, संदीप तांबवे, रमेश पाटील, श्री सरवदे, सुभाष सातपुते, श्री काकड, मंगेश आढाव, संजय गोरड, सामाजिक कार्यकर्त्या रूपाली आल्हाट, संगीता घोलप, स्वाती बेंद्रे, श्रध्दा तिजारी यावेळी उपस्थित होते. मागील तीन वर्षापासून जयंती आणि यावर्षीपासून रक्तदान शिबिर सुरु केले. सोसायटीतील पन्नास सदस्यांनी रक्तदान केले. राजमाता जिजाऊ यांनी दोन छत्रपती घडवले, परंतु राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी केली जात नाही. त्यामुळे त्यांची जयंती आम्ही दरवर्षी साजरी करतो. फक्त शहरात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात जयंती साजरी झाली पाहिजे. कारण जिजाऊ यांच्या विचाराची समाजाला गरज आहे, असे मत जीकेपी सोसाटीचे चेअरमन संजीवन सांगळे यांनी व्यक्त आले.मराजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त मोशीतील जी.के. पॅलेसियो सोसाटीमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा पार पडली. शिबिरास आणि स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# दादांची महायुतीच्या मेळाव्याकडे

## 'तिसरी बार मोदी सरकार, इसबार चारसो पार' असा संकल्प

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित महायुतीच्या मेळाव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पाठ फिरवली. आमदार माधुरी मिसाळ यांची अनुपस्थिती आणि चेतन तुपे यांची अल्प काळासाठीची उपस्थिती चर्चेचा विषय ठरली. दरम्यान, 'तिसरी बार मोदी सरकार, इसबार चारसो पार' असा संकल्प करत आगामी लोकसभा निवडणुकीत पुण्यासह राज्यातील सर्व ४८ जागा जिंकण्याचा निर्धार महायुतीच्या मेळाव्यात रविवारी करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील चारही जागांवर महायुतीचा उमेदवार मोठ्या फरकाने विजयी होईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घटक



पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय आणि मनोमिलन साधण्यासाठी भाजप, शिवसेना, अजित पवार गट, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), शिवसंग्राम आणि अन्य मित्रपक्षांचा जिल्ह्याचा पहिला संयुक्त मेळावा येत्या रविवारी झाला. विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी राज्यमंत्री विजय शिवतरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी राज्यमंत्री दत्तात्रेय भरणे, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहरप्रमुख अजय भोसले आणि प्रमोद भानगिरे, रिपाइंचे शहराध्यक्ष परशुराम वाडेकर यांच्यासह तिन्ही पक्षाचे आमदार उपस्थित होते. राजकीय विचारधारा काही असली तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींची विकासाची विचारधारा हाच भारताचा धर्म होईल. राजकीय इच्छाशक्ती आणि अपार कष्ट करायची ताकद इतर पक्षातील नेत्यांना भावत आहे. त्यामुळे मेळाव्याच्या निमित्ताने महायुती हाच आपला पक्ष आहे आणि महायुतीमधील तिन्ही पक्षांचे मनोमिलनाचा धागा कायम ठेवावा, असे आवाहन महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केले. आगामी निवडणुकीत बारामतीची जागा पडणार आहे. ती २०१४ ला जाणार होती. मात्र थोडक्यात घोटाळा झाला. या राज्याने दोन वर्षे 'बसे' मुख्यमंत्री पाहिले. तेलंगणातही असेच मुख्यमंत्री होते. लोकांनी त्यांना घरी बसविले. लोकांना काम करणारी सेना हवी आहे. अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमावर काँग्रेसने बहिष्कार टाकला आहे. बहिष्कार टाकण्याशिवाय त्यांना दुसरे काही येत नाही. आगामी निवडणुकीत जनता त्यांच्यावर बहिष्कार टाकेल. निवडणुकीला शंभर दिवस राहिले आहेत. त्यामुळे महायुतीतील सर्वांनी एकदिलाने काम केले पाहिजे. कामाचे नीट वाटप करून नव्याने वेळापत्रक तयार करा. पुणे लोकभेसाठी ७५ टक्के मतदान झाले पाहिजे, यादृष्टीने प्रयत्न करा, अशी सूचना प्रकाश जावडेकर यांनी केली. रामराजे निंबाळकर म्हणाले की, मोदींच्या कार्यशैलीमुळे सर्वजण एकत्र आले आहेत. १९७२ च्या दुष्काळात मिलो खाणारा देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यस्था होत आहे. याचे दुसऱ्या पक्षातून आलेल्यांना आकर्षण आहे. राजकीय विचारधारा काही असली तरी मोदींची विकासाची विचारधारा हाच भारताचा धर्म होईल.

### मनोमिलनाचा धागा ठेवला पाहिजे


**» राजकीय इच्छाशक्ती आणि अपार कष्ट करायची ताकद इतर पक्षातील नेत्यांना भावत आहे. त्यामुळे विजयाच्या हॅट्रिकमध्ये येण्याचे भाग्य राष्ट्रवादीला मिळाले आहे. उगाच काही न करणारे नेतृत्व आता नाही. एकमेकांविषयीची कटुता दूर करण्याची संधी या मेळाव्यात आली आहे. पूर्वीच्या नेतृत्वाबद्दल काही बोलणार नाही, परंतु मोदीशिवाय पर्याय नाही. महायुतीतील पक्षांना काही तरी द्या, अशी मागणी होते. मात्र महायुती हाच आपला पक्ष अशी भावना असली पाहिजे. त्यासाठी मनोमिलनाचा धागा कायम ठेवला पाहिजे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित महायुतीच्या मेळाव्याला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पाठ फिरवली. आमदार माधुरी मिसाळ यांची अनुपस्थिती आणि चेतन तुपे यांची अल्प काळासाठीची उपस्थिती चर्चेचा विषय ठरली.**

# मी लढणार, उभं राहणार आणि निवडूनही येणार

## शिरुर मतदारसंघात माजी खासदार आढळराव पाटलांचे आव्हान

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मी लढणार, मी निवडणुकीला उभं राहणार आणि निवडूनही येणार असं म्हणत शिरुर मतदारसंघात (डहळऑॅअॅ डेझ डरलहर उेपींर्ळीशपल्) आढळराव पाटील (डहर्ळीरक्षळऑॅ अवहरश्ररऑॅ झरींळश्र) यांनी आव्हान दिलं आहे. दरम्यान यामुळे अमोल कोल्हेंची डोकेदुखी पुन्हा वाढणार का याकडे लक्ष लागून राहिलंय. राज्याच्या राजकारणात भूकंप झाल्यानंतर मतदारसंघात बऱ्याच कुरघोडी सुरु असल्याचं पाहायला मिळतंय. शिरुर मतदारसंघात सध्या राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे आहेत, पण या जागेवर शिंदे गटाकडून आढळराव पाटील इच्छुक असल्याच्या चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु आहेत. त्यातच आता आढळराव पाटलांनी व्यक्त केलेला हा विश्वास अमोल कोल्हेंना थेट आव्हान तर नाही असा प्रश्न उपस्थित केला जातोय. राज्यभरात १४





जानेवारी रोजी महायुतीकडून मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यावेळी आढळराव पाटलांनी मतदारसंघावर भाष्य केलं. त्यांनी म्हटलं की, तिन्ही पक्ष एकत्र येऊन या जागे संदर्भात निर्णय घेतील. ज्या पक्षाला ही जागा जाईल त्या पक्षासाठी इतर दोन पक्ष काम करतील. मी लढणार, मी निवडणुकीला उभं राहणार आणि निवडून येणार हे पूर्ण सत्य आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी अजित पवारांकडून या मतदारसंघासाठी दावा करण्यात आला होता. त्यानंतर महायुतीमध्ये पुन्हा एकदा एका मतदारसंघावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात होती. अमोल कोल्हे यांना आगामी लोकसभा निवडणुकीत पाडणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केल्यापासून शिरूर लोकसभा मतदारसंघ चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे मागच्यावेळी या लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेच्या वतीने शिवाजीराव आढळराव पाटील आणि राष्ट्रवादीकडून अमोल कोल्हे मैदानात होते. मात्र, या दोन्ही पक्षात आता दोन गट निर्माण झाले आहेत. शिवाजीराव आढळराव पाटील शिंदे गटात आणि अमोल कोल्हे शरद पवार गटात आहेत. महाविकास आघाडीत अमोल कोल्हे यांनाच उमेदवारी मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# सहव्याधीग्रस्त करोना रुग्णांना रेमडेसिवीर

## राज्याच्या करोना कृती दलाची शिफारस

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राज्यात करोनाचा उपप्रकार जेएन.१ची रुग्णसंख्या वाढत आहे. त्यामुळे राज्य सरकारने करोना कृती दलाची स्थापना केली आहे. या कृती दलाने सहव्याधीग्रस्त करोना रुग्णांना रेमडेसिवीर औषध देण्याची शिफारस केली आहे. याचबरोबर सरसकट सर्वच करोना रुग्णांना प्रतिजैविके देणे टाळावे, अशी सूचनाही केली आहे. करोना कृती दलाने करोना रुग्णांवरील उपचारांबाबत सूचना केल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, जेएन.१ च्या रुग्णांमध्ये सर्दी, ताप, खोकला यासारखी फ्ल्यूची लक्षणे असू शकतात. याचबरोबर श्वास घेण्यास त्रास होण्याचेही लक्षण दिसू शकते. सहव्याधी नसणाऱ्या करोना रुग्णांना विषाणूप्रतिबंधक औषधे



देण्याची आवश्यकता नाही. त्यांच्यावर लक्षणांनुसार उपचार करावेत. सहव्याधी असणाऱ्या करोना रुग्णांना तीन दिवस रेमडेसिवीरची मात्रा द्यावी अथवा निर्माट्रेलविर किंवा रिटोनाविर या गोळ्या ५ दिवसांसाठी द्याव्यात. ही औषधे उपलब्ध नसतील तर मोलनुपीरावीर या गोळ्या रुग्णाचे समुपदेशन करून द्याव्यात. श्वसनविकाराचा त्रास असलेल्या करोना रुग्णांना रेमडेसिवीरची मात्रा ५ दिवसांसाठी द्यावी. करोना रुग्णांना सरसकट प्रतिजैविके देऊ नयेत.

त्यांना इतर संसर्ग असल्यास आणि सहव्याधी असलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार प्रतिजैविके द्यावीत. सर्व करोना रुग्णांच्या फुफ्फुसाचे सीटी स्कॅन करण्याची गरज नाही. केवळ श्वसनविकार असलेल्या रुग्णांमध्ये ही तपासणी करावी, असेही टास्क फोर्सने म्हटले आहे. फ्ल्यूसदृश लक्षणे असलेल्या करोना रुग्णांना रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात स्टेरॉईड देऊ नयेत. रुग्णालयात दाखल आणि कृत्रिम ऑक्सिजची आवश्यकता असलेल्या रुग्णांनाच आवश्यकतेनुसार स्टेरॉईड द्यावेत. श्वसनविकार असलेल्या करोना रुग्णांमध्ये ऑक्सिजन पातळी ९४ टक्क्यांपेक्षा कमी असल्यास डेक्सामेथासोन स्टेरॉईडचा वापर करावा, असे टास्क फोर्सने नमूद केले आहे. या कृती दलाने सहव्याधीग्रस्त करोना रुग्णांना रेमडेसिवीर औषध देण्याची शिफारस केली आहे. याचबरोबर सरसकट सर्वच करोना रुग्णांना प्रतिजैविके देणे टाळावे, अशी सूचनाही केली आहे.

करोना कृती दलाने करोना रुग्णांवरील उपचारांबाबत सूचना केल्या आहेत. त्यात म्हटले आहे की, जेएन.१ च्या रुग्णांमध्ये सर्दी, ताप, खोकला यासारखी फ्ल्यूची लक्षणे असू शकतात. याचबरोबर श्वास घेण्यास त्रास होण्याचेही लक्षण दिसू शकते. सहव्याधी नसणाऱ्या करोना रुग्णांना विषाणूप्रतिबंधक औषधे देण्याची आवश्यकता नाही. त्यांच्यावर लक्षणांनुसार उपचार करावेत. सहव्याधी असणाऱ्या करोना रुग्णांना तीन दिवस रेमडेसिवीरची मात्रा द्यावी अथवा निर्माट्रेलविर किंवा रिटोनाविर या गोळ्या ५ दिवसांसाठी द्याव्यात. ही औषधे उपलब्ध नसतील तर मोलनुपीरावीर या गोळ्या रुग्णाचे समुपदेशन करून द्याव्यात. श्वसनविकाराचा त्रास असलेल्या करोना रुग्णांना रेमडेसिवीरची मात्रा ५ दिवसांसाठी द्यावी. करोना रुग्णांना सरसकट प्रतिजैविके देऊ नयेत. राज्यात करोनाचा उपप्रकार जेएन.१ची रुग्णसंख्या वाढत आहे. त्यामुळे राज्य सरकारने करोना कृती दलाची स्थापना केली आहे.

# माझ्या निवडणुक प्रचाराला अजित पवार येणार

## शिवसेना नेते विजय शिवतारे यांचे विधान

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

माझ्या प्रचाराला अजितदादाच येणार असल्याचे सांगत विजय शिवतरे यांनी अजित पवार यांच्या कामाचे कौतुक केल आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे जिंकून येणार नाहीत, असेही ते म्हणाले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांना खुली धमकी दिली होती. तू निवडून कसा येतो, तेच बघतो.अख्ख्या



महाराष्ट्राला माहीत आहे, मी ठरवलं तर एखाद्याला आमदार होऊच देत नाही, असं विधान अजित पवारांनी शिवतारेंना उद्देशून केलं होतं. त्याप्रमाणे विजय शिवतारेंना पराभवालाही सामोरं जावं लागलं होतं. त्यानंतर या दोन्ही नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले होते. मात्र सहा महिन्यांपूर्वी अजित पवार हे शिंदे फडणवीस यांच्या सरकारमध्ये सहभागी झाले आणि उपमुख्यमंत्रीपदी विराजमान देखील झाले. तर त्याही पुढे जाऊन पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीदेखील झाले. त्याच दरम्यान शासन आपल्या दारी कार्यक्रमामध्ये अजित पवार आणि विजय शिवतारे या दोन्ही नेत्यांमध्ये चांगल्या प्रकारे संवाददेखील पाहण्यास मिळाला. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमधील वाद मिटल्याचे दिसून आले. या सर्व घडामोडींदरम्यान आज पुणे जिल्ह्याचा महायुतीचा मेळावा झाला. त्या मेळाव्यानंतर विजय शिवतारे यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधला. अनेक राजकीय घडामोडींबाबत त्यांनी भाष्यदेखील केले. अजित पवार महायुतीबरोबर आल्याने आगामी निवडणुकीत तुमची अडचण होणार का ? या प्रश्नावर विजय शिवतारे म्हणाले की, महायुतीमध्ये अनेक नेते, पक्ष सहभागी होत आहेत. देशाचे नाव सर्वदूर आणि विकास काम करणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. मी राज्याचा विकास होण्याच्या दृष्टीने महायुतीमध्ये सहभागी झालो, असे विधान अजित पवार यांनी यापूर्वीच केले आहे. त्यानुसारच राज्यात अनेक ठिकाणी विकास कामे सुरू आहेत.